
ए.पी.जे. अब्दुल कलाम
रहस्यमंथन
यशराज पारखी

# झिरो टू हिरो ज़र्नि
# ऑफ़
# डॉ.एपीजे अब्दुल कलाम

लेखक संपादक – यशराज पारखी

लेखकाचे मनोगत
डॉ एपीजे अब्दुल कलाम हे माझे दैवत आहे, मी नुकताच त्यावेळी दहावीचे शिक्षण झाल्यावर गव्हर्नमेन्ट पॉलिटेक्निक पुणे येथे २००१ साली डिप्लोमा पूर्ण केला आणि डिप्लोमा नंतर पुढील शिक्षण बाहेरून पुणे विद्यापीठ येथून पूर्ण करीत असताना पुणे पिम्परी चिंचवड़ येथे एल्प्रो इंटरनैशनल ह्या कंपनीत नोकरीला लागलो त्यावेळी २५ जुलै २००२ मध्ये डॉएपीजे अब्दुल कलाम देशाचे राष्ट्रपती झाले मला अजूनही आठवते त्यावेळी सर्व न्यूज चॅनेल व वृत्तपत्रे मध्ये डॉ एपीजे अब्दुल कलाम ह्यांच्या यशोगाथे बद्दल बोलले जात होते. खरंतर मी घेतलेले डिप्लोमा शिक्षण मला कितपत योग्य आहे ह्या गोंधळात मी होतो त्यावेळी डॉएपीजे अब्दुल कलाम ह्यांची यशोगाथा वाचली आणि ठरवले काहीही झाले तरी चालेल पण बाहेरून आपले शिक्षण चालूच ठेवायचे .
माझ्या जीवनाला एक दिशा देणारे व्यक्तिमत्त्व म्हणजे डॉ एपीजे अब्दुल कलाम होय .कलाम साहेब ह्यांना चेन्नई येथे दोनदा भेटलो पुढे त्यांच्या जुन्या घरी देखील मी जावून आलो .सुदैवाने माझी पत्नी माया हिचा दिव्यांगावर मात करुन तिने जी काही यशस्वी उद्योजिका म्हणून कामगिरी केली त्याबद्दल देखील डॉ एपीजे अब्दुल कलाम ह्यांनी सन्मान केलेला आहे
अशा डॉ अबुल पाकिर जैनुलाबुद्दीन अब्दुल कलाम ह्यांचे व्यक्तिमत्त्व अधिकाधिक तरुणांना कळावे आणि अधिकाधिक तरुणांनी प्रेरणा घेऊन भारत देशाला विकसित करण्याचे स्वप्न साकार करावे ह्या हेतूने मी छोटे पुस्तक आपल्या समोर प्रस्तुत करत आहे

धन्यवाद आपला यशराज पारखी

भारतरत्न व भारताचे सर्वोत्तम राष्ट्रपती व जगप्रसिद्ध शास्त्रज्ञ डॉ अबुल पाकीर जैनुलाबद्दीन अब्दुल कलाम म्हणजेच ए पी जे अब्दुल कलाम यांच्या विषयी आपण ह्या पुस्तकाच्या माध्यमातून जाणणार आहोत.
सध्या दक्षिण भारतात तामिळनाडूमध्ये रामनाथापुरम जिल्ह्यामध्ये रामेश्वरम नावाने शहर आहे, भारत स्वतंत्र होण्यापूर्वी हेच रामेश्वरम गाव होते. ह्यांच ठिकाणावरून सीता मातेला सोडवण्यासाठी भगवान श्रीरामाने लंकेला जाण्यासाठी सेतू बांधला होता, त्यावरूनच ह्या ठिकाणास रामेश्वरम असे नाव पडले असावे अशी आख्यायिता प्रचलित आहे. रामेश्वरम मध्ये सर्व जाती धर्माची लोक गुण्या गोविंदाने राहत होते, त्यामध्ये जैनुलाबद्दीन व आशियाम्मा हे जोडपे देखील राहत होते. जैनुलाबद्दीन हे एक नावाडी तर होतेच पण ते निष्ठेने लोकांची सेवा देखील करीत असत. जैनुलाबद्दीन आणि आशियाम्मा ह्यांच्या घरची परिस्थिती अत्यंत गरीब होती, मोठ्या कष्टाने त्यांनी गावात एक कौलारू घर उभारले होते. जैनुलाबद्दीन व आशियाम्मा यांना पाच मुले झाली, त्यामध्ये मोहम्मद मुथू, कसिम मोहम्मद, मुस्तफा कमल आणि मुलगी असीम जोहरा आणि पाचव्या मुलाचा जन्म 15 ऑक्टोबर 1931 रोजी झाला, त्याचे नाव अब्दुल असे ठेवण्यात आले. अब्दुल सर्व भावंडाच्या बरोबर लहानाचा मोठा होत होता, रोज तो घरीच मुस्लिम रीतिरिवाजा नुसार आपल्या भावांसह नमाज करीत असे.



अब्दुल लहानाचा मोठा होत असताना, वयाच्या ८व्या ९व्या वर्षी एक प्रसंग घडला आणि त्यामुळे त्याच्या जीवनाला एकदम कलाटणी मिळून गेली, तो दिवस आनंदाचा होता, ईद असल्यामुळे आज तो वडिलांबरोबर मशिदीत जाऊन साऱ्या मुस्लिम भविकांबरोबर नमाज पढणार होता. मशिद त्याच्या झोपडीजवळच होती. मशिदीत सारे एकत्र जमले. सर्वांबरोबर तो मुलगा ही अल्लाहची प्रार्थना करू लागला. प्रार्थनेचा अर्थ त्याच्या बालमनास कळत नव्हता. म्हणून त्याने आपल्या वडिलांना विचारले " अब्बा, मौलाना क्या बता रहे हैं, त्यावर जैनुलाबद्दीन म्हणाले बेटा वो बता रहें , आगर तुम कोई भी सच्चे दिल से अल्लाताला से मागोंगे तो वो पुरी हो जायेगी ! त्यावर छोटासा अब्दुल कुतूहलाने पुन्हा बोलतो, क्या अब्बा सचमुच, त्यावर वडील म्हणतात हा बेटा सचमुच !

नमाज संपला आणि सर्व समाजबांधव प्रसन्न मुद्रेने मशिदीच्या बाहेर पडू लागले. मस्जिदीच्या प्रवेशद्वाराजवळ काही लोक उभे होते,त्यांच्या हातात पाण्याने भरलेले छोटे छोटे गडवे/भांडे होते. त्या लोकांत मुसलमान तर होतेच. पण हिंदू ही होते. ते सर्व लोक जैनूलाबद्दीन यांची आतुरतेने वाट पाहत होते. जैनूलाबद्दीन त्यांच्या लहान मुलांबरोबर मशिदीतून बाहेर आले. त्या गोरगरीब, दिन-दुबळ्या लोकांच्या चेहऱ्यावर हसू उमटले. ते दुःखी लोक  आपले गडवे घेऊन जैनुलाबद्दीन यांच्या समोर एकत्र झाले, त्यातील एक हिंदू म्हणाला तुम्ही आमच्या साठी देवाचे अवतार आहात, तुम्ही पाण्याला स्पर्श केला आणि त्याचे आम्ही प्राशन केले तर आमचे दुःख व आजार दूर होतात, एक मुल्सिम म्हणाला आप तो हमारे लिए खुदा के बंदे हो, आपने पाणी को स्पर्श किया तो हमारा दुःख दरड बिमारी दूर हो जाएगी ! जैनुलाबद्दीन आकाशाकडे पाहतात आणि म्हणतात,

‘ या अल्लाह! या दुःखीजनांचे दुःख दूर कर! ‘  असे म्हणून त्याने त्या गडव्यातल्या पाण्याला स्पर्श केला. पाणी म्हणजे जीवन! त्यांच्या दुःखी जीवनाला प्रेमाचा स्पर्श केला.दुःखीजनांचे दुःख हलके झाले. त्यांना फार मोठे समाधान मिळाले आणि त्या लोकांनी जैनुलाबद्दीन यांचे आभार मानले. त्या लोकांमधील मुसलमान म्हणू लागले आप हमारे खुदा है!

हिंदू म्हणाले आपण आमचे देव आहात.आपल्या हातात दैवी शक्ती आहे. आपल्या प्रेमळ स्पर्शाने पाण्याचे अमृत होते. आजाऱ्याला आराम मिळतो.

आणि ते लोक निघून गेले. ते सारे तो लहान मुलगा अब्दुल पाहत होता, ऐकत होता. त्याच्या मनात जिज्ञासा निर्माण झाली. पण कोण होते ते लोक ? अब्बाने/वडिलांनी त्यांच्या गडव्यातल्या पाण्याला स्पर्श का केला ? अब्बाच्या हातात दैवी गुण आहेत का ? अब्बा खरोखरच खुदाचे बंदे आहेत का ?

घरी गेल्यावर त्याने रात्री झोपण्यापूर्वी आईला विचारले. आईने सांगितले, तुझ्या अब्बाच्या हाताला अल्लाहने फार मोठा गुण दिला आहे! प्रेमाचा ! अब्बाचा रामेश्वरम मधील लोकांना त्यांना मोठा आधार वाटतो. त्यामुळे रामेश्वरममध्ये त्यांना खुदा आणि देवमाणूस समजतात. थोड्या वेळाने आई झोपली पण त्या लहान मुलाच्या मनात नवीन प्रश्न निर्माण होते त्याने त्याच्या मनालाच विचारले "अब्बाच्या हातात अल्लाह ने प्रेमाचा गुण दिला....ते साऱ्यांचे खुदा झाले....देव झाले... अम्माच्या हातातही अल्लाह ने गुण दिला... तिच्या हाताच्या स्वयंपाकाला अमृताची गोडी असते...ती साऱ्यांची अन्नपूर्णा आहे.. मला अल्लाह ने कोणता गुण दिला?" या आठ वर्षाच्या मुलाच्या मनात प्रश्न उभारला. मी मोठा होऊन कोण होणार? मै बडा होकर कौन बनूंगा ! असा

विचार करीत तो झोपी गेला. पहाटे पहाटे त्याचे हात पक्ष्यांच्या पंखाप्रमाणे हलू लागले आणि तो मनातल्या मनात हसू लागला, आईचे त्याच्याकडे लक्ष गेले आणि ती घाबरली. तिने त्याला हलवून जागे केले आणि म्हणाली "काय झाले तू स्वप्न पाहत होतास का ?"

तो मुलगा म्हणाला, " मला एक सुंदर स्वप्न दिसले, स्वप्नात निळ्या निळ्या आकाशात लहान मोठे पक्षी आपले पंख हलवून आकाशात आनंदाने विहार करीत होते. मलासुद्धा आकाशात झेप घ्यावीशी वाटली, मी पंखासारखे हात हलवून आकाशात झेप घेतली आणि उडत राहिलो. मला खूप आनंद झाला. मला आकाशात झेप घ्यायची आहे.

आई ने त्याला जवळ घेतले आणि ती म्हणाली, बेटा ! ते झोपेतले स्वप्न होते.स्वप्नात काहीही दिसते. झोपेतले स्वप्न खरे व्हावे असे वाटत असेल,तर स्वप्न सतत जिवंत ठेवावे लागेल. अल्लाह वर निष्ठा ठेवावी लागते. अल्ला तुला भविष्यात एखादा मोठा वैमानिक किंवा विज्ञान शास्त्रज्ञ बनवेल.पहाट झाली, मशिदीत तो मुलगा नमाज पढू लागला.अल्लाहला त्याने आपले स्वप्न सांगितले आणि प्रार्थना केली, या अल्लाह !माझे स्वप्न खरे होऊ दे! '

आयुष्यभर अब्दुलने स्वप्नाला सातत्याने जागे ठेवले.

रहस्यमंथन बोध

श्रीमंत्रीच्या रहस्यग्रंथानुसार प्रत्येकाला मी कोण आहे आणि मी कोण होणार आहे हा प्रश्न पडत असतो.त्यावर आपल्या अंतःमनाचे ऐकून आपल्या आतल्या आवाजाचे ऐकून जो व्यक्ती आपले स्वप्न पाहून सातत्याने त्या स्वप्नावर लक्ष केंद्रित करतो त्यावेळेस राहस्यग्रंथानुसार त्या दिशेने ऊर्जा वाहू लागते आणि आपले स्वप्न पूर्ण होणारच आहे असा दृढ विश्वास ठेऊन सतत तो ठेवल्यास आणि अंतःमनातील प्रेरनेनुसार कार्यभाग केल्यास तुम्हाला जे पाहिजे ते खात्रीने मिळू शकेल

प्रसिद्ध ' गेल डेव्हर ' व्यक्तीने असे म्हटले आहे

Keep your dream alive, understand to achieve anything requires faith and belief in yourself, vision, determination and dedication. Remember all things are possible for those who believe.

तुमचे स्वप्न सातत्याने जीवंत ठेवा. जे पाहिजे ते मिळविण्यासाठी तुमचा स्वतःवर असलेला विश्वास महत्वपूर्ण आहे. दूरदृष्टि व तीव्र इच्छाशक्तिच्या जोरावर कोणतीही गोष्ट शक्य आहे. बऱ्याचदा मझी परिस्थिति नही, हे कसे शक्य होणार? ह्या विचारामुळे मनुष्य खचतो.पण तुमचा वर्तमानकाळ कसाही असो जे मिळवायचे आहे ते तुम्ही मिळवू शकता.

या ठिकाणी झोपेत आकाशात उडण्याचे स्वप्न पाहनारा हा मुलगा दुसरा तीसरा कोणी नसून अब्दुल आहे.म्हणजेच श्रीमंत डॉ. ऐ.पी.जे. अब्दुल कलाम आहेत . चला ! हे कसे घडले ते पाहूया.......

जैनुलाबद्दीन यांचे उत्पन्न कमी असल्यामुळे घरखर्च भागवने अवघड होते.त्यामुळे अब्दुल पेक्षा मोठ्या असलेल्या मुलांना अब्बाने कोणता व्यवसाय करू इच्छीतो ते विचारले असता मोठ्या मुस्तफाने मी किराण्याचे दुकान सुरु करणार असे सांगितले तर दुसऱ्या कसिमने मी शंख शिम्पल्यांचे दुकान चालवणार असे सांगितले. ती दोनही मुले आपापला व्यवसाय चालवून घरास हातभार लावू लागले. अब्दूलला सुद्धा असे वाटू लागले की मी सुद्धा काहीतरी कमवून घरास हातभार लावावा,पण दुकानास सहाय्य केले तर अभ्यासास वेळ होणार नाही म्हणून शाळेतून सुटल्यावर घरी जाताना चिंचुके गोळा करून ते विकायचे आणि पैसे मिळवायचे,मिळालेले पैसे आईकडे आणून द्यायचे हा उपक्रम अब्दुल यांचा सातत्याने सुरू होता . पुढे जाऊन वर्तमाणपत्रांचे सकाळी वर्गीकरण करून घरोघरी पेपर टाकणे ह्या मेहनतीतून मिळालेले पैसे अब्दुल आईला प्रामाणिक पणे देत असें . आई तो एक एक पैसा अब्दुल यांना गरज लागल्यावर द्यायची आणि ते पैसे खर्च

करायची नाही उलट त्यामध्ये घरातली थोडीफार शिल्लक रक्कमसुद्धा टाकायची.

रामेश्वरम येथील प्राथमिक शिक्षण पूर्ण झाल्यावर्ती पुढील शिक्षण घेण्याकरिता रामनाथपुर ठिकाणी जाण्याचे गरजेचे होते. त्यासाठी आवश्यक पैसे नव्हते पण अब्दूलने केलेल्या कमाईतून आणि आईने जमवलेल्या पैशातून तो प्रश्न सुटला.

‘राहस्यमंथन बोध’

‘श्रीमंतीच्या राहस्यग्रंथानुसार मी कोन आहे आणि मी कोण होणार हा प्रश्न प्रत्येक लहान मोठ्या  सर्वच व्यक्तींना पडत असतो. त्यावर आपल्या अंतःमनाचे ऐकून,आपल्या आतल्या आवाजाचे ऐकून जेव्हा व्यक्ती आपले स्वप्न पाहून सातत्याने त्या स्वप्नावर लक्ष्य केंद्रित करतो त्यावेळेस राहस्यग्रंथानुसार त्या दिशेने ऊर्जा वाहू लागते आणि आपले स्वप्न पूर्ण होणारच आहे असा दृढ विश्वास ठेवून सतत जागे ठेवल्यास आणि अंतःमनातील प्रेरनेनुसार कार्यभाग केल्यास तुम्हाला जे पाहिजे ते खात्रीने मिळू शकेल. त्याचबरोबर पालकांनी सुद्धा त्यांच्या मुलाने किंवा मुलीने काय बनावे, की मिळवावे हे स्वतः न ठरवता मुलांच्या इच्छेप्रमाणे घ्यावे आणि त्यानुसार त्यांना प्रोत्साहित करावे. काय बनावे आणि मिळवावे हे सर्वस्वी मुलांच्या इच्छाशक्तीवर अवलंबून आहे.

आईच्या आणि वडिलांच्या पाठिंब्याने रामेश्वरमच्या एक गरीब अशिक्षित नावाड्याच्या झोपडीत तो मुलगा पदवीधर झाला. रामेश्वरातला तो पहिला मुलगा अब्दुल कलाम पदवीधर झाले.

जैनुलाबद्दीन यांचा आनंद तर उफाळून आलाच होता आणि तो आनंदाने बोलू लागला,'आता माझे स्वप्न साकार होणार ! अब्दुल आता कलेक्टर होणार !' पण रात्री झोपताना एकाएकी असे वाटले. आपल्या स्वप्नापेक्षा अब्दूलची काय इच्छा आहे ते अधिक महत्त्वाचे आहे.
अब्बाने अब्दूलला विचारले,आता पुढे तुझी काय करायची ईच्छा आहे ? अब्दुल म्हणाले, ' मला वैमानिक व्हायचे आहे,त्याचे सारे तंत्र शिकायचे आहे. मला वैमानिक होऊन असे कार्य करायचे आहे,की सारे जग थक्क होईल.त्यासाठी मला 'मद्रास इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी स्कूल' मध्ये शिकायचे आहे.

गरीब परिस्थितीमुळे कॉलेज ची फी भरणे शक्य नव्हते, पण लहानपणापासून मी पाहिलेले माझे स्वप्न पूर्ण होणारच! मी वैज्ञानिक होणारच! मी आकाशात उडणारच! यावर अब्दुल कलाम यांचा विश्वास होता. अल्ला/सृष्टी/विश्व शक्ती माझे स्वप्न जरूर पूर्ण करणार असा विश्वास होता. कॉलेजमध्ये दाखविण्यासाठी

लागणाऱ्या  फी चा प्रश्न सुटला कारण बहिणीने तिच्या सोन्याच्या बांगड्या आणि दागिने गहाण  ठेवून अब्दुल कलाम यांना फी साठी सहकार्य केले होते.

‘रहस्य मंथन बोध’

जेव्हा संपूर्ण विश्वासाने तुम्हाला जे पाहिजे ते मिळण्यावर किंवा तुम्हाला जे बनायचे आहे त्याची मागणी करून त्यावर संपूर्ण विश्वास ठेवल्यावर ज्या पद्धतीने तुम्हाला 100 किमी जायचे असते पण जसे रात्री गाडी चालवताना फक्त 100 मीटर पर्यंतचे अंतर तुम्हाला दिसते तुम्हाला 100 किमी चे अंतर दिसत नाही. एक पाऊल दोन पाऊल एक पाऊल दोन पाऊल प्रमाणे 100 मीटर, 100 मीटर करत-करत तुमचे ध्येय पूर्ण होते. पण त्याकरिता सृष्टी कडून मिळणाऱ्या प्रेरणेवर विश्वास ठेवून कार्य करायला हवे. उदाहरण अब्दुल कलाम यांना असे वाटले की मी सुद्धा एखादा तास काम करून थोडेफार पैसे कमवावेत व  खरं पाहता विश्व शक्ती कडून मिळालेला एक संदेश होता. त्या संदेशावर अंमलबजावणी केल्याने थोडे थोडे करून पुढील शिक्षणाच्या खर्चाची सोय झाली. असेच परिपूर्ण श्रीमंत होण्याकरिता हा रहस्य ग्रंथाचा बोध फायदेमंद होईल. याचा संदर्भ पुन्हा दुसऱ्या वेळेला म्हणजे वैमानिक होण्याकरिता जेव्हा एरोनॉटिकल इंजिनीअरिंग साठी प्रवेश घेताना तीव्र इच्छाशक्तीमुळे पैशाचा प्रश्न सुटला. कारण बहिणीने दागिने गहाण ठेवले.

म्हणजेच यावरून असा संदर्भ मिळतो की, रहस्य ग्रंथानुसार तुम्हाला जे पाहीजे ते पक्के करा ते स्वप्न जागे ठेवत विश्वास ठेवा ते कसे होईल काय होईल यावर चिंता करत बसू नका. सृष्टी अवश्य त्या गोष्टीची पूर्तता करेल .

अब्दुल कलाम मद्रासच्या अभियांत्रिकी कॉलेजमध्ये इंजीनियरिंगचे शिक्षण घेण्यासाठी दाखल झाले. इंजीनियरिंगचे सारे तंत्र शिकू लागले. इंजीनियरिंगचे शिक्षण घेताना शिष्यवृत्ती मिळाल्यामुळे, शिक्षणाच्या खर्चाची चिंता मिटली. अब्दुल कलाम यांना फक्त ज्ञान ग्रहण करण्याचे व्यसन होते. वाचनाचे व्यसन होते. एका पुस्तक प्रेमी नेत्यांने विचारले! तुम्हाला बायबल ने कोणते मर्म सांगितले अब्दुल म्हणाले एकच मर्म सांगितले

"मागा म्हणजे मिळेल आत्ताच मिळणार नाही पण एक दिवस मिळेलच मिळेल"

'रहस्य मंथन बोध '

बायबल वाचल्यानंतर रहस्य ग्रंथाचा संदर्भ बायबलमध्ये सुद्धा आहे हे समजते तीन हजार वर्षांपासून चालत आलेले रहस्य अब्दुल कलाम यांना समजले होते तेच रहस्य श्रीमंतीच्या रहस्य ग्रंथात मांडलेले आहे.

अब्दुल कलाम ह्यांना पायलट बनायचे स्वप्न होते, परंतु त्यांना कोणीही योग्य मार्गदर्शन करणारे नव्हते त्यामुळे त्यांनी बीएस सी ला ॲडमिशन घेतले व शिक्षण घेत असताना फायनल वर्षे असताना त्यांना कळले की

पायलट बनायचे असेल तर त्यासाठी 'एयरोनॉटीकल ईंजीनीयरींग' मध्ये शिक्षण घ्यावे लागते , मार्गदर्शक नसल्यामुळे आयुष्यातील तीन वर्ष वाया घालवीले असे त्यांना वाटले !.. त्यादिवशी ते खुप खुप खुप रडले!.. आणि आपण यशस्वी झाल्यावर भारतातील तरुणांची मार्गदर्शन नसल्याने वर्ष वाया जावू नये म्हणून आयुष्याच्या शेवटच्या श्वासापर्यंत कार्य केले. परंतु पुढे जाऊन त्यांच्या लक्षात आले की कोणतेही शिक्षण हे वाया जात नसते फ़क्त त्यासाठी कोणत्याही गोष्टींकडे सकारात्मक वृत्तीने पाहिले पाहिजे .



परंतु याच बीएससी फीजीक्सने त्यांचे जीवन घडविले आणि ते सर्वोत्तम शास्त्रज्ञ झाले !...
कॉलेजमध्ये अब्दुल यांच्या कल्पनाशक्तीची,बुद्धिमतेची व प्रतिभेची कसोटी होती त्यांच्या आकाशात झेप घेणाऱ्या स्वप्नाची कसोटी होती श्रीनिवास सरांनी त्याला

कमी उंचीवरून हल्ला करणारे लढाऊ विमान स्वतंत्र कल्पनेने एक डिझाइन तयार करण्यास सांगितले दोन महिने मुदत होती पण मनासारखे डिझाईन जमत नव्हते शेवटचे तीन दिवस राहिले अब्दुल यांनी आणखी काही दिवसांची मागणी केली.

सर ठामपणे नकार देत म्हणाले तू प्रोजेक्ट जर वेळेवर दिला नाहीस तर प्रोजेक्ट रद्द होईल आणि तू नापास होशील शिष्यवृत्ती बंद होईल अब्दुल कलाम यांनी प्रोजेक्ट वेळेवर पूर्ण करण्याचा ध्यास घेतला रात्र-दिवस प्रोजेक्ट डिझाईन पूर्ण करू लागले आणि अवघ्या तीन दिवसात अशक्यप्राय ठरणारे डिझाईन,त्याचे नवनिर्मितीचे डिझाइन,त्याच्या कौशल्याचे डिझाईन,त्याचे आकाशात झेप घेणाऱ्या स्वप्नाचे डिझाइन तयार केले , सकाळी श्रीनिवास सर जेव्हा अब्दुलच्या घरी आले आणि त्यांनी प्रोजेक्ट पाहिला आणि हे सर्व अब्दुलने अवघ्या तीन दिवसात पूर्ण केले त्यामुळे कौतुकाची थाप म्हणून श्रीनिवास सर यांच्या तोंडातून अप्रतिम असे शब्द बाहेर पडले.

'रहस्य मंथन बोध'

कोणत्याही गोष्टीची प्राप्ती करण्यासाठी तीव्रता निर्माण करणे गरजेचे आहे एखाद्या वेळेस अगदी सहजतेने आपल्या जीवनात ती तीव्रता निर्माण होते त्यामुळे जे

काम बराच वेळ देऊनही पूर्ण झालेले नसते तेवढे कमी वेळात निर्माण झालेल्या तीव्रतेमुळे पूर्ण होते उदाहरण जर तुम्हाला मी एक किलोमीटर अंतर दहा मिनिट पूर्ण करण्यास सांगितले तर कदाचित ते होणार नाही पण जर चुकून तुमच्या मागे एखादा पिसाळलेला कुत्रा लागला तर मात्र हे सहजतेने पूर्ण होईल आपल्या जीवनात कामाची पूर्ण तेही अगदी जाणीवपूर्णक तीव्रता निर्माण करणे गरजेचे आहे.

बीएससी नंतर एयरोनॉटीकल ईंजीनीयर ची पदवी घेतली ,त्यावर्षी संपुर्ण भारतातुन केवळ आठ मुलं ही पदवी घेऊ शकले !.. त्यात अब्दुल कलाम हे टॉपर होते !..

त्याकाळी फक्त 'एअर ईंडीया' हीच कंपनी पायलटच्या जागा भरायची कारण तेव्हा खासगीकरण झाले नव्हते !..

एयर इंडिया  कंपनीला त्यावर्षी त्यांना आठ जागा भरायच्या होत्या! आणि त्यासाठी अर्ज मात्र नऊ आले होते ! त्या परीक्षेत अब्दुल कलाम ह्यांचे ईंटरव्यु होऊन सीलेक्शन झाले ! परंतु ऐसे असताना देखील

एपीजे अब्दुल कलाम सोडुन सर्व उमेदवारांना नोकरी मिळाली. कारण टॉपर असलेले अब्दुल कलाम ह्यांनी बुद्धीने बाजी मारली पण डॉ. कलाम यांची "ऊंची"

कमी आहे,या निर्णयामुळे सीलेक्शन कमीटीने त्यांना नाकारले.

सिलेक्शन न झाल्याने एपीजे अब्दुल कलाम खुप हताश झाले.. त्याठिकाणी जवळच त्यांना हरिद्वारचा मठ दिसला. आणि अब्दुल कलाम ह्यांनी हरिद्वारच्या मठात काही वेळ बसण्याचा निर्णय घेतला. एपीजे अब्दुल कलाम लहान असताना अनेकदा उदास किंवा हताश झाले की रामकृष्ण मठात जात असत तेथे जावून विविध पुस्तकांचे वचन करीत असत. त्यांना घड़वण्यात रामकृष्ण मिशनच्या मठांचा खुप सहभाग आहे असे अनेकदा डॉ एपीजे अब्दुल कलाम ह्यांनी बोलून दाखवले आहे.

हरिद्वार मठामधील तेथील स्वामीजींनी सांगीतले, " का ऊदास होतोस?.. जीवनातील एका संग्रामात अपयशी ठरलास, याचा अर्थ नव्हे, की तु कर्तृत्ववान व यशस्वी पुरुष बनु शकत नाही !.. कदाचीत ईश्वराने तुझी निवड एखाद्या महान कार्यासाठी केली असेल !.. आणि पुढे खरोखरच तसे घडले.
पायलट म्हणून सिलेक्शन न झाल्याने एपीजे अब्दुल कलाम घरी जाण्यासाठी दिल्लीला परत आले..
दुस−या दिवशीच्या पेपरमध्ये,"एयरोनॉटीकल इंजीनियर पाहीजे" अशी जाहीरात होती,टी जाहिरात विक्रम साराभाई ह्यांनी दिली होती पगार एअर इंडीयाच्या दुप्पट

होता, विशेष म्हणजे त्याठिकाणी इंटरव्यूह साठी पुन्हा तेच आठ कँडीडेट आलेले होते. एकच जागा असल्याने कोणा तरी एकाचेच सिलेक्शन होणार होते.यावेळी मात्र एपीजे अब्दुल कलाम यांचीच निवड झाली कारण येथे उंचीची अट नव्हती.

दुस-या दिवशी एपीजे अब्दुल कलाम नोकरीला गेले, म्हणाले, "सांगा विमान कुठे घेऊन जायचे?"..

विक्रम साराभाई म्हणाले, "आपल्या जवळ विमानच नाहीये ..आणि मला खात्री आहे की हे विमान तूच बनवशील!

आणि पुढे जाऊन विक्रम सारा भाई ह्यांचे बोलणे खरे झाले आणि एपीजे अब्दुल कलम ह्यांनी विमाने तर बनवलीच आई पुढे शिक्षण चालू ठेवून आणि डॉक्टरेट पदवी देखील मिळवली.

रहस्यमंथन बोध : आयुष्यात तुमच्या आयुष्यात जर तुम्ही जे ठरले आहे ते ध्येय कोणत्याही कारणाने प्राप्त करू शकला नाही तरी खचून जावू नका कारण तुमचे ध्येय पुर्तीसाठी कदाचित त्यासाठी उत्तम पर्याय तुमची वाट पाहत असेल त्यामुळे सातत्याने कार्यरत रहा कृती करत रहा.

"जीवनात अपयशी झालात तर एक गोष्ट नक्की लक्षात ठेवा अपयश हीच यशाची पायरी आहे  फ़क्त पहिल्या कृतीत कशामुळे अपयश आले त्यावर बारकाईने अभ्यास करुन पुढील कृती करा.
F.A.I.L. चा अर्थ First Attempt In Learning असाच आहे , हे लक्षात घ्या.

अब्दुल कलाम यांचे अभियांत्रिकी( इंजीनियरिंग) शिक्षण पूर्ण झाले. इंजीनियरिंग झाल्यावर नोकरी करावी आणि लहानपणी पासून पहिलेल्या स्वप्नानुसार अब्दुल कलाम यांनी विमान, पायलट होण्यासाठी अर्ज भरला, त्यामध्ये ते सिलेक्ट झाले पण नवव्या क्रमांकावर, पण आठच जागा शिल्लक होत्या. अब्दुल कलाम यांचा नंबर नववा लागला आणि त्यांची निराशा झाली त्यांची वैमानिक म्हणून नेमणूक झाली नाही. ते निराश झाले पण यापेक्षा कदाचित दुसरी मोठी संधी माझ्यासाठी असेल, आजचे अपयश उद्याचे यश म्हणून नैराश्य झटकून अब्दुल कलाम उभे राहिले आणि खरोखरच तसे झाले. दिल्लीमध्ये विज्ञान शाखेत वैज्ञानिकांसाठी त्यांनी अर्ज केला होता आणि त्याची संरक्षण खात्यात प्रमुख विज्ञान अधिकारीपदी नेमणूक झाली.



लहानपणापासूनच पाहिलेले जागवलेले स्वप्न पूर्ण झाले.सर्वांचा आनंद गगनात मावेनासा झाला.

अब्दुल कलाम ज्या संरक्षण खात्यात वैज्ञानिक म्हणून झाले होते, तेथे लढाऊ विमानावर संशोधन केले असे, त्यामध्ये अब्दुल कलाम यांनी आणखी स्वप्न पाहिले ते म्हणजे लढाऊ, बिन पंख्याचे विमान, हवेत सहज उडणारे विमान, कोणतेही धक्के न खाता अलगत उडणारे विमान! खडकाळ जमिनीवरून खोल दऱ्याखोऱ्यातून, पाण्यावरून चालणारे विमान, सारे मोठे मोठे अडथळे सहज पार करून आपले लक्ष

गाठणारे विमान व्होव्हर क्राफ्ट लढाऊ विमान बनवण्याची.......



पुढे त्यांच्यावर फार महत्त्वपूर्ण जबाबदारी वैज्ञानिक अब्दुल कलाम यांच्यावर ओपी मोदी रता या केंद्राचे डायरेक्टर यांच्या द्वारे सोपविण्यात आली.
जबाबदारी त्यांच्यावर देण्यात आली फक्त प्रबळ इच्छाशक्ती,दृढ विश्वास व सांघिक भावनेने काम करण्याच्या प्रवृत्तीमुळे नंदी नावाचे हॉवर क्राफ्ट विमान त्यांनी तयार केले कलामांचा नंदी भारतीय विज्ञानात क्रांतीची नांदी ठरला कलामांच्या नेतृत्वाखाली बनवलेल्या नंदी विमानाची चाचणी घेण्यासाठी भारताचे संरक्षण मंत्री कृष्ण मेनन येणार होते.

ही नांदी विमानाची पहिली चाचणी होती त्यामुळे सर्वांच्या मनात भीती निर्माण झाली पण ह्या पहिल्या विमानाच्या पूर्ततेमुळे डॉक्टर एपीजे अब्दुल कलाम यांचे स्वप्न पूर्ण

होणार होते त्यांना त्यांच्या कार्यावर पूर्ण विश्वास होता अगदी नवीन अनुभव असताना सुद्धा कलामांनी स्वतः विमान चालवले ते सुरक्षित परत आले प्रयोग यशस्वी झाला कलामांचे स्वप्न साकार झाले.

अब्बा आणी अम्मीने लग्नाविषयी विचारले असता माझे लग्न झालेले आहे तिचे नाव आहे तंत्रकला विज्ञानकला असे त्यांनी सांगितले विज्ञान कार्यालयात मी वाहून घेणार आहे माझ्या मातृभूमीची निस्वार्थ सेवा करणार आहे पुढील काळात आपल्या प्रतिभेने व कौशल्याने एकेक नवीन अग्नी,पृथ्वी,धनुष्य,आकाश अशी अनेक क्षेपणास्त्रे त्यांनी निर्माण केली या क्षेपणास्त्राने अवकाशात झेप घेतली कलामांच्या कर्तुत्वाचे मौल झाले एका स्वप्नाची पूर्तता झाल्यानंतर दुसऱ्या गोष्टीची मागणी करणे योग्य ठरते त्यानुसार पुढे डॉक्टर ची स्वप्ने पाहिली ती पूर्ण झाली सर्व जगातील तरुणांसाठी एक चैतन्यमय स्वप्नपूर्तीची साखळी त्यांनी निर्माण केली.

त्यांना अनेक विद्यापीठांनी डॉक्टर ऑफ सायन्स ही पदवी दिली अब्दुल कलाम आता डॉक्टर एपीजे अब्दुल कलाम झाले पद्मभूषण नंतर पद्मविभूषण आणि भारताचा सर्वोच्च बहुमानाचा किताब भारतरत्न त्यांना मिळाला त्यानंतर डॉक्टर कलाम यांनी भारतातील प्रथम नागरिक होण्याचे राष्ट्रपती पदाचे स्वप्न पाहिले ते स्वप्न देखील पूर्ण झाले खरं पाहता हे एक स्वप्नपूर्तीचे राजेच आहेत

भारतरत्न डॉक्टर एपीजे अब्दुल कलाम यांचा साऱ्या देशाला अभिमान वाटला या नवनिर्मितीच्या शिल्पकला 25 जुलै 2002 रोजी साऱ्या देशाच्या जनतेने राष्ट्रपतीपदावर आरूढ केल्या .




डॉक्टर एपीजे अब्दुल कलाम यांचे पूर्ण नाव अब्दुल पाकीर जैनुलाबदिन अब्दुल कलाम.

रहस्य मंथन बोध

आपल्या जन्माचा स्त्रोत म्हणजे आपले आईवडील त्यांच्या जन्माचा स्त्रोत म्हणजे आजोबा आणि त्या अगोदरच पंजोबा त्याप्रमाणे रहस्य ग्रंथानुसार जेव्हा आपण आई-वडिलांचे आभार व्यक्त करतो आपल्या



आजोबांचे,आजीचे,पंजोबा आणि पणजीचे आभार व्यक्त करतो तेव्हा  या विश्वातील सर्वाधिक शक्तिशाली असलेल्या विश्व शक्तीशी जोडले जातो आणि विश्व शक्तीशी जोडल्यावर तुमची मागणी अगदी सहजतेने पूर्ण होते म्हणून सर्वांचे आभार व्यक्त पर्याय म्हणून डॉक्टर अब्दुल कलाम साहेब आपले नाव अबुल पाकीर जैनुलाबद्दीन अब्दुल कलाम{APJ अब्दुल कलाम} सांगत असावेत.

अशाप्रकारे सातत्याने स्वप्नाला जागे ठेवून कळत नकळत श्रीमंतीचा रहस्य ग्रंथ डॉक्टर एपीजे अब्दुल कलाम यांनी वापरला आणि तेव्हा इच्छेचे स्वप्न चुंबकीय उर्जा प्रमाणे प्रत्यक्षात उतरले म्हणून स्वप्न पक्के करा श्रीमंत जीवनाची तीव्र इच्छा निर्माण करा त्या स्वप्नाला सतत जागे  ठेवा आणि ते पूर्ण झालेले आहे असा विश्वास

ठेवा जेव्हा तुम्ही तुम्हाला जे पाहीजे ते मिळवण्याकरिता दृढ विश्वास ठेवत असता अंतःप्रेरणा आत्मविश्वास तर तो पूर्ण असतो त्यानुसार अंमलबजावणी होणे हे आपल्या वरील संदर्भ जाणवते.

अब्दुल कलाम यांनी लहानपणापासून आपल्या स्वप्नाला जागे ठेवले आणि स्वप्न साकार केले त्यांना जे पाहीजे ते त्यांनी या राष्ट्रासाठी,देशासाठी व समाजासाठी मिळवले आता त्यांनी लहान-मोठ्या,तरुण-वृद्ध, शिक्षित अशिक्षित अशा सर्वांमध्ये भारत 2020 म्हणजे बलशाली शक्तिशाली प्रगत देशाचे स्वप्न प्रत्येकामध्ये जागवले आहे आणि ते पूर्ण होणारच हा संपूर्ण जगाला विश्वास आहे.



राष्ट्रपती म्हणून डॉ एपीजे अब्दुल कलाम ह्यांनी सर्वाधिक चांगली कामगिरी केली . राष्ट्रपती पदानंतर डॉ एपीजे

अब्दुल कलाम सातत्याने देशाच्या काना कोपऱ्यात विद्यार्थी आणि सर्वच क्षेत्रातील मंडळी ह्यांना मार्गदर्शन करण्यासाठी सातत्याने विविध कार्यक्रमाला उपस्थितीत राहिले. माझी तब्येत ठीक नाही म्हणूनअंथरुणाला खेळून न राहता डॉ एपीजे अब्दुल कलाम विविध कार्यक्रमातून भारत देशाला विकसित होण्यासाठी सतत झटत राहिले असेच एक शिलॉन्ग येथे कार्यक्रमा दरम्यान डॉ एपीजे अब्दुल कलाम ह्यांचा मृत्यु कार्यक्रम स्थळी स्टेजवर दिनांक २७जुलै २०१५रोजी झाला

आजही विकसित भारत म्हंटले की डॉ एपीजे अब्दुल कलाम ह्यांचे नाव प्रथम घेतले जाते

आणि लवकरच तरुण पिढीच्या मार्गदर्शनाखाली व नेतृत्वाखाली भारत देश विकसित भारत होईल

मेरा और हमारा एकही सपना
विकसित भारत जल्दही हो अपना

होय डॉ एपीजे अब्दुल कलाम ह्यांनी स्वप्न पाहिले आहे विकसित भारत २०२०.
तेच स्वप्न पूर्ण करण्यासाठी मी आपल्या समोर एक अनोखी संकल्पना मांडणार आहे .
ती संकल्पना आहे, विकसित भारताला प्रत्यक्षात उतरवण्याची , त्यासाठी मला काय करायचे आहे किंवा त्यामुळे मला काय फायदा होणार असाच प्रश्न तुम्ही विचारत आहात ना !
मी आणि माझे सहकारी ह्यांनी ठरवले आहे की आपण सर्वांनी मिळून ९५ % स्वार्थी होवून जीवन जगायचे, होय स्वार्थी होवून जीवन जगायचे. आपल्या जीवनात ९५% आपण फ़क्त आपल्या स्वतःचा आपल्या कुटुंबाचा आपल्या आई वडिलांचा अणि आपल्या मुलां मुलींचा विचार करायचा . आपल्या बरोबरच घरातील सर्वाना उत्तम आरोग्य दीर्घायुष्य , चांगले राहणीमान , चांगले शिक्षण खरी श्रीमंती आणि समृद्धी कशी लाभेल ह्याचाच विचार करायचा.
तुम्ही म्हणाल अहो सध्या आम्ही १०० % ह्यासाठीच जीवन जगतो आहे, अगदी बरोबर ओळखलेत आत्ता फ़क्त थोडासा बदल करायचा आणि १०० % ऐवजी ९५ % स्वार्थी जीवन जगायचे. आणि ५ % जीवन हे मात्र आपल्या भारत देशासाठी जगायचे .

तुमच्या मनात प्रश्न आला आहे ना, हे सर्व कशासाठी, थोडे अजुन वाचा म्हणजे सविस्तर समजेल,
आपण उद्योग धंदा , किंवा नोकरी किंवा कोणतेही प्रोफेशन कशासाठी करतो ?
उत्तर : माझ्या स्वतःसाठी , माझ्या कुटुंबासाठी बरोबरच ना ?
मग विचार करा दिवसभर तुमचे कुटुंब किती वेळ तुमच्या सोबत आहे गणित केले तर लक्षात येईल की तुम्ही तुमच्या कुटुंबातील सर्वांबरोबर केवळ ५ % क्वालिटी टाइम देता आणि उर्वरित वेळ तुमच्या कुटुंबातील अधिकाधिक व्यक्ती ह्या समाजामध्ये इतरांच्या बरोबर ९५ % आहेत. म्हणजे तुमचे कुटुम्ब चांगले राहणे सुरक्षित राहणे व त्यांची प्रगती होणे ह्यासाठी तुम्ही इतरांच्या वर अवलंबून आहात.
चला तर आपल्याला हे समजले की सर्वांनी ९५ % स्वार्थी होवून स्वतःसाठी आणि कुटुंबासाठी जगायचे आणि ५ % देशासाठी म्हणजे भारताला विकसित होण्यासाठी जगायचे.
५ % जीवन देशासाठी म्हणजे नक्की काय ?
आपण जगभरातील भारतीय ह्यांची एक टाइम बैंक निर्माण केली आहे ,
टाइम बैंक म्हणजे काय ?
टाइम बैंक हे शब्द कदाचित तुम्ही प्रथमच ऐकले असतील,

विचार करा पूर्वी च्या काळात आजच्या सारख्या ठिकठिकाणी पैसे च्या बैंक नव्हत्या मग त्याची गरज भासली आणि आत्ता आपल्याला गल्ली बोळात बैंक शाखा दिसतात.

तसेच काही आपण भारताला विकसित करण्यासाठी जगभरातील सर्व भारतीयांची एक टाइम बैंक निर्माण केली आहे.

उदहारण : तुम्ही तुंमच्या उद्योग धंदा नोकरी ह्यामध्ये साधारणपणे दररोज ८ तास म्हणजे महीनाभरात २५ दिवस तुम्ही २०० तास काम करता .

ह्या महिन्यातील कामाच्या २०० तासाचे ५ % म्हणजे १० तास होतात , त्यानुसार महीनाभरातील १० तास तुमचे नाहीत तर तुमच्या देशाचे आहेत.

त्यानुसार प्रत्येक शहर प्रत्येक वार्ड किंवा तालुका किंवा जिल्हा पातळीवर आपण ५ % जीवन देशासाठी जगणाऱ्या भारतीयांची आपण टाइम बैंक निर्माण करणार आहोत .

उदाहरण : पुणे शहरात ५ % जीवन जगणारे भारतीय १००० जन आहेत त्यांचे महिन्याचे १० तास म्हणजे पुणे शहर ह्यांच्या कड़े १०००० तासांची टाइम बैंक आहे.

आत्ता ह्या १०००० तासात पुणे शहर ह्यांनी के काय करायचे हयाबाबत तेथील टीम ने विकसित भारताचे निकस पूर्ण होण्यासाठी आवश्यक गोष्टीवर लक्ष केंद्रित करून समाज कार्य करायचे

उदाहरण : विकसित भारत होण्यासाठी स्वच्छता निकस आहे, राहनीमान चांगले असले पाहिजे आणि प्रत्येक भारतीय ह्यांचे प्रति व्यक्ती मिळणारे उत्पन्न हे योग्य असले पाहिजे असे अनेक निकस सुधारून देशाला विकसित करणे हेतूने कार्य करायचे

म्हणजेच १३० करोड़ जनतेपैकी केवल ५ % जनता विकसित भारता साठी कार्य करण्यास सुरुवात केली तर एका महिन्यात ६.५ करोड़ जनता आणि त्यांचे १० तास म्हणजे दरमहिन्याला विकसित भारत होण्यासाठी ६५ करोड़ तासांची टाइम बैंक निर्माण होईल आणि ह्या ६५ करोड़ तासांच्या माध्यमातून भारत देश नक्कीच विकसित होण्याच्या दिशेने कार्य करेल.

५ % टाइम बैंक आणि ५ % मनी बैंक(देणगी donation बैंक )
कशाप्रकारे आपण  ५ % टाइम बैंक निर्माण केली तसेच ५ % donation बैंक देखील ,निर्माण केली आहे. ह्यां अंतर्गत प्रत्येक भारतीय ह्यांनी किमान १०० रूपये प्रतिमहा किंवा ५ % देणगी आपल्या कमाई पैकी देणगी स्वरुपात द्यावी.
उदाहरण : एक भारतीय नोकरी किंवा उद्योग धंदा किंवा प्रोफेशन ह्या माध्यमातून २५००० रूपये कमवतो म्हणजे २५००० रूपये ह्यांचे ५ % होतात ५०० रूपये.आपल्या संकल्पने नुसार त्या भारतीय व्यक्तीने किमान १०० रूपये

आणि अधिकाधिक ५०० रूपये देणगी विकसित भारत होण्यासाठी द्यावी. त्यानुसार अब्जावधी रूपये जमा होतील परन्तु हे अब्जा वधी रूपये केवळ आणि केवळ विकसित भारत होण्यासाठीच खर्च करण्यात यावेत.

हे खर्च कोण करणार ?

५ % जमा झालेली देणगी खर्च कोण करणार आणि कोठे करणार आणि कशासाठी करणार ?

जसे मी वर सांगितले की ५ % जीवन जगणाऱ्या व्यक्तीची टाइम बैंक निर्माण करुन आपण कृति मध्ये आलो परन्तु अनेक कामे पूर्ण करण्यासाठी आवश्यक निधि आवश्यक आहे तो निधी देखील त्याठिकाणच्या स्थानिक टीम ने खर्च करावा व त्यांचे सोशल ऑडिट करून हिशोब जगासमोर ठेवावा.

ह्या संकल्पनेत भारत देश बाहेरील भारतीय ह्यांचा कसा रोल राहिल व त्यांनी कसे काम करायचे ?

कोणत्याही देशात जेथे भारतीय आहेत त्या देशात भारतीय ह्यांनी टाइम बैंक व donation बैंक निर्माण करून त्यांनी देशाला सहकार्य करावे शिवाय सोशल मिडिया व इतर मिडिया माध्यमातून देशात कार्यरत असणाऱ्या विकसित भारत स्थानिक टिमला मार्गदर्शन करावे व आवश्यक ते सहाय्य करावे .

धन्यवाद विकसित भारत आत्ता शक्य आहे

लेखकाचा परीचय
.
नाव : यशराज हिरामण पारखी
जन्म : १ डिसेंबर, १९८१,
पत्ता : मुक्काम पोस्ट माण, पो. हिंजवडी, ता. मुळशी, जि. पुणे
Contact : 9922992210, 9922604442, Email ID: yashrajparkhi@gmail.com
Facebook @ Yashraj Parkhi, twitter @ Yashraj_Parkhi

शिक्षण:1)M.B.A Specializations in Marketing from Institute of Management Education
2) B.A. in Psychology, Public Admin. & Political Science from Pune University
3) D.M.E - Diploma in Mechanical Engineering from Government Polytechnic Pune
4) D.C.N.T- Diploma in Cellular Nutrition Therapy
5) 20 Years of Life Education from Various International Institutes like Worldwide Landmark Education, Empower India Movement, Self Expression & Leadership Program, Team Management & Leadership Program, Mission Control, Happy Thoughts, Vipashyana, Manshakti.

Profession/समाजातील ओळख :
आदर्श राजकारणी, प्रेरणादायी प्रवक्ता, उद्योजक, लेखक.
International Speaker for Team Management & Leadership and various life Coaching.

कार्य व गौरव:

लेखक म्हणून आजवर पाच पुस्तकाचे लेखन. स्वतः उद्योजक म्हणून यशस्वी झाले व समाजातील हजारो तरुणांमधून उद्योजक घडवले. रियल एस्टेट क्षेत्रात यशस्वी प्रोजेक्ट पुणे मुंबई मध्ये पूर्ण केले. प्रवक्ता म्हणून आजवर जम्मू कश्मीर ते चेन्नई येथे विविध विषयावर व्याख्याने. एक आदर्श युवा राजकारणी म्हणून ते सतत कार्यरत.

पुरस्कार
आजवर मानद डॉक्टरेट, अनफा अवार्ड चेन्नई, राष्ट्रगौरव, समाज गौरव, सम्राट अशोक मित्र, शिवप्रताप शिवरत्न, धम्म मित्र, फिलिप्स गॉडफ्रे, माण भूषण अशा पुरस्काराने सन्मानित.

कौटुंबिक पार्श्वभूमी
छत्रपती शिवाजी महाराज यांच्या काळापासून महत्व असणाऱ्या हिंजवडी माण, येथे पारखी कुटुंबात जन्म. पूर्वी पासून पारखी कुटुंबाकडे गावची पाटीलकी व सरपंच पद होते. शिक्षण क्षेत्रामध्ये अग्रेसर असणारे विद्वान व पारखी नजर असल्याने त्यांना पारखी हे नाव लाभले. स्वातंत्र्य संग्रामापासून ते देशाच्या घडामोडी एक कट्टर काँग्रेसी कुटुंब अशी ओळख व दबदबा. सध्या राजीव गांधी इन्फोटेक पार्क हे जगातील सर्वोत्तम आयटी पार्क ओळखले जाते. त्याकरिता १८०० एकर जागा हिंजवडी माण मारुंजी येथील गावकऱ्यांनी महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाला दिली. त्यामध्ये पारखी कुटुंबाचा सिंहाचा वाटा आहे. पारखी कुटुंब हे पुणे जिल्ह्यात राजकीय, सामाजिक क्षेत्राबरोबरच वारकरी संप्रदायाबरोबर गेली १०० वर्षाहून अधिक कार्यरत. हिरामण पारखी यांनी एस टी महामंडळ मध्ये कंट्रोलर म्हणून सेवा केली. सोबत काँग्रेस व Indian National Trade Union Congress (इंटक) बरोबर सहभागी. या सर्व बाबींमधून यशराज पारखींना सामाजिक कार्याबरोबर राजकारणाचे व नेतृत्व कौशल्याचे बाळकडू प्राप्त झाले.

जीवनपट:
१९८७-९१ प्राथमिक शिक्षण व मानसोपचारतज्ज्ञ डॉ. विलास भैलुमे, यांचेकडे अर्धवेळ मदतनीस.

१९९१-९८ माध्यमिक शिक्षण शंकरराव मोरे विद्यालय.८५ % गुणांसह मॅट्रिक उत्तीर्ण. राज्यस्तरीय शालान्त वकृत्त्व स्पर्धेत पारितोषिके. सोबत वृत्तपत्र व दुग्ध वाटप व्यवसाय. मे. काळे फुटवेयर मध्ये अर्धवेळ नोकरी.

१९९८-२००१ गव्हर्नमेंट पॉलीटेकनिक, पुणे येथे कल्चरल सेक्रेटरी व जनरल सेक्रेटरी पदे सांभाळत मेकॅनिकल इंजिनीरिंग (७७%) पूर्ण. डिप्लोमा करतानाच दररोज १५० विद्यार्थ्यांची शिकवणी व दर शनिवारी रांगोळी क्लासेसच्या माध्यमातून १२००० मुलामुलींना रांगोळी शिकवली.

२००१-०२ एल्प्रो इंटरनॅशनल या आंतरराष्ट्रीय कंपनीत एक वर्ष पूर्णवेळ नोकरी. त्यावेळी मॅनेजरने यशराज पारखी यांच्या स्वतःहून जबाबदारी घेऊन केलेल्या कामगिरीवर प्रभावित होऊन व्यवसायाचा सल्ला दिला. वयाच्या १५ व्या वर्षांपासून जीवन शास्त्र म्हणजेच यशस्वी जीवन जगण्याचे शिक्षण भगवद्गीता, श्रीमद दासबोध, हैप्पी थॉट्स, विपश्यना, प्राजित स्वमदत गट, एम्पॉवर इंडिया तसेच प्रेरणादायी पुस्तके वाचणे, विविध व्याख्याने ऐकणे यामाध्यमातून घेतले.

२००२-०८ पदवी व एमबीए व इतर शिक्षणाबरोबर इंडियन नोनी प्रॉडक्ट, चेन्नई करीता प्रेरणादायी प्रवक्ता व रिजनल डायरेक्टर म्हणून जम्मू काश्मीर, पंजाब, हरियाणा, दिल्ली, राजस्थान, गुजरात, मध्य प्रदेश, छत्तीसगड, झारखंड व संपूर्ण महाराष्ट्र भर कार्य केले.

२००८-११ सेराजेम या साऊथ कोरियन कंपनीसोबत कोथरूड, सिंहगड व पिरंगूट येथे एकूण ५००० स्क्वे.फु. च्या ऑफिसेसमधून व ६० कामगारांच्या साहाय्यातून १ लाख रुग्णांच्या मणक्यावर मोफत थेरपी व सुमारे ६०० हून अधिक थेरपी यंत्रांचे विक्री.

२००९ मध्ये वयाच्या २७ व्या वर्षी कोथरूड विधानसभा सदस्य निवडणूकित अपेक्षित यश मिळाले नाही.

२०११ मध्ये "श्रीमंतीचा रहस्यग्रंथ" हे पुस्तक सुनीताराजे पवार ह्यांच्या संस्कृती प्रकाशन तर्फे प्रकाशित (मराठी बेस्टसेलर). राष्ट्रपती डॉ. एपीजे अब्दुल कलाम, उद्योजक धीरूभाई अंबानी, माजी उपमुख्यमंत्री आर. आर. पाटील, शिक्षण महर्षी पतंगराव कदम यांचे रहस्यमंथन.

२०१४ मध्ये "बाळासाहेब ठाकरे यशोगाथा" १०० हून अधिक यशराज सूत्रासहित - पुस्तक उद्धवजी ठाकरे, उद्योग मंत्री सुभाष देसाई व डॉ अमोल कोल्हे व सर्व शिवसेना नेते ह्यांच्या उपस्थित रंगशारदा भवन, मुंबई येथे प्रकाशित. त्यावेळी शिवसेना पक्षामध्ये प्रवेश करा, असे आवाहन केले. परंतु, पन्नास वर्षांपासून आमचे पारखी कुटुंब हे काँग्रेसशी संलग्नित आहे, असे म्हणून आदरपूर्वक नकार.

२०१६ मध्ये विधानपरिषद निवडणुकीमध्ये पुणे स्थानिक स्वराज्य संस्थेमधून उभे राहिले. एकूण ७०० पैकी १०० नगरसेवकांची पहिल्या दुसऱ्या व तिसऱ्या क्रमांकाची पसंती प्राप्त.

२०१७ पासून भारतीय राष्ट्रीय काँग्रेस मध्ये सक्रिय सहभाग व वाटचाल.

२०१९ मध्ये इ साहित्य ह्या वेबसाइटच्या माध्यमातून यशराज पारखी ह्यांनी लिहलेली अमिताभ बच्चन, शरद पवार, धीरूभाई अंबानी, इंदिरा गाँधी ह्यांच्या वर लिहिलेली पुस्तके २४ लाख लोकांपेक्षा अधिक लोकांपर्यंत पोहचली

२००९ ते २०१९ पर्यंत एक उद्योजक व बिल्डर म्हणून यशराज पारखी ह्यांनी कोट्यावधी रुपयांचे प्रोजेक्ट पूर्ण मुंबई भागात पूर्ण केले आणि सध्या यशराज पारखी पारखी प्रमोटर्स आणि डेव्हलपर्स प्रा लि ह्या कंपनीमध्ये चयेरमन आहेत